नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३३१ Issue - 331 | वार बुधवार दि. २२ एप्रिल २०२६ Blow- Wednesday Date 22 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## अतिउष्णतेच्या संकटाचा सामना करण्यासाठी सक्षम उपाययोजना करणार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; उष्णता प्रतिसादक्षम व शाश्वत शीतकरणासाठी सेंटर फॉर एक्सलेन्सचा शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : हवामान बदल या संकटाचा सर्वाधिक फटका शेती क्षेत्राला, विशेषतः अल्प भूधारक शेतकऱ्यांना बसत आहे अतिउष्णतेच्या संकटावर उपाययोजना करण्यासाठी तसेच उष्णता प्रतिसादक्षम व शाश्वत शीतकरणासाठी सेंटर फॉर एक्सलेन्स'चा शुभारंभ करण्यात आला असून हे केंद्र भविष्यात राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेचा भाग म्हणून कार्यरत होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दूरदृष्यप्रणालीद्वारे आयआयएम, नागपूर येथील सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर हिट रेसिलियन्स अँड सस्टेनेबल कुलिंग'चे उदघाटन केले. यावेळी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, नाशिकच्या महापौर हिमगौरी आहेर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, नॅचरल रिसोर्सेस डिफेन्स कौन्सिलचे अध्यक्ष मनीष बापना, एनआरडीसी इंडियाच्या कंट्री डायरेक्टर दीपा सिंग बगई, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे संचालक डॉक्टर भालचंद्र चव्हाण, नागपूर इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे संचालक डॉ. भिमराया मैत्री उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,विदर्भासह राज्याच्या अनेक भागांत अलीकडे उष्णतेच्या लाटेमुळे शाळा-महाविद्यालये बंद ठेवण्याची वेळ आली होती. हवामान बदल या संकटाचा सर्वाधिक फटका शेती क्षेत्राला, विशेषतः छोट्या शेतकऱ्यांना बसत आहे. दुष्काळ, गारपीट आणि वाढते तापमान यामुळे समस्याही गंभीर होत आहेत, यावर तोडगा काढण्यासाठी सेंटर फॉर एक्सलन्स उपयुक्त ठरणार आहे. या संस्थेमार्फत सुरुवातीला प्राधान्याने उष्णलाट कृती आराखडा आणि शहरी हवामान कृती आराखड्यांचा आढावा घेऊन प्राधान्य दिलेल्या शहरांना आणि जिल्ह्यांना तांत्रिक अंमलबजावणीसाठी सहाय्य केले जाईल. उष्णलाट कृती आराखड्यासाठी सक्षम योजना तयार करणे, वार्षिक अंमलबजावणीवर भर देणे. त्यासाठी अधिकारी, आरोग्य कर्मचारी, स्थानिक शहरी नागरिकांसाठी प्रशिक्षण आराखडा तयार करण्यात येणार आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शाश्वत विकासासाठी महाराष्ट्र ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होत आहे. २०३० पर्यंत ५२ टक्के ऊर्जा नवीकरणीय स्रोतांमधून, २०३५ पर्यंत ६५ टक्के ऊर्जा अपारंपरिक स्रोतांतून घेण्याचे नियोजन आहे. शेतकऱ्यांना लागणारी १६ हजार मेगावॅट वीज सौर ऊर्जेद्वारे देण्याचा प्रयत्न सुरू आहे. वाढत्या उष्णतेमुळे सर्वत्रच एसी वापर वाढतो त्यामुळे होणारे पर्यावरणाचे नुकसान टाळण्यासाठी यावर उपाय म्हणून राज्यात प्रभावी हीट ॲक्शन प्लॅन' राबवला जाईल. बांधकाम क्षेत्रात आणि दैनंदिन वापरात स्थानिक व पर्यावरणपूरक उपाययोजनांना प्राधान्य देऊन विकास साधण्यावर भर देण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

नागपूरला आंतरराष्ट्रीय महत्व प्राप्त: एनआरडीसी'चे अध्यक्ष मनीष बापना

नॅचरल रिसोर्सेस डिफेन्स कौन्सिलचे अध्यक्ष मनीष बापना म्हणाले की, स्वच्छ ऊर्जा आणि त्यासोबतच शाश्वत कूलिंग या विषयांवर आपण जे लक्ष केंद्रित करत आहोत, ते आजच्या काळातील अत्यंत महत्त्वाचे मुद्दे आहेत. येणाऱ्या वर्षांत त्यांचे महत्व अधिकच वाढत जाणार आहे. विज्ञानक्षेत्रात प्रगती होत आहे आणि नवनवीन धोरणेही आखली जात आहेत. जोपर्यंत आपल्याकडे ही धोरणे राबवण्यासाठी सक्षम संस्था नसतील, तोपर्यंत आपण अपेक्षित प्रगती करू शकणार नाही. त्यामुळेच, एक्स्ट्रीम हीट अँड सस्टेनेबल कूलिंग'साठी नागपुरात विशेष सेंटर ऑफ एक्सलन्स' हे केंद्र केवळ भारतासाठीच नाही, तर संपूर्ण जगासाठी वैशिष्ट्यपूर्ण योगदान ठरेल. यामुळेच या केंद्राला आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त झाले आहे असेही ते म्हणाले.

उष्णतेच्या वाढत्या संकटावर तोडगा काढण्यासाठी आयआयएम नागपूरमध्ये विशेष केंद्र (पान २ वर...)

## बालविवाह मुक्त अभियानात राज्य देशात आघाडीवर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : राज्यात अक्षय तृतीयेच्या पार्श्वभूमीवर महिला व बाल विकास विभागाने स्पेशल फोर्स'च्या माध्यमातून मोठी कारवाई करत एकाच दिवशी तब्बल ३२ बालविवाह रोखण्यात यश मिळवले असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

बाल विवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ नुसार १८ वर्षांखालील मुलगी व २१ वर्षांखालील मुलाचा विवाह लावणे हा दंडनीय गुन्हा असून, बाल विवाह मुक्त राज्य बनविण्यासाठी महिला व बालविकास विभाग बाल विवाह मुक्त भारत हे अभियान राबवित असून, अतिशय कडक कारवाई करत राज्य देशात आघाडीवर आहे.

**अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर ३२ बालविवाह रोखले : मंत्री आदिती तटकरे' महिला व बाल विकास विभागाच्या स्पेशल फोर्स'ची राज्यव्यापी धडक कारवाई**

अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर काही भागांत पारंपरिक पद्धतीने अल्पवयीन बालकांचे विवाह लावण्याची प्रथा अद्यापही आढळून येते. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने बाल विवाह मुक्त भारत या १०० दिवसांच्या अभियानांतर्गत व्यापक जनजागृती, समन्वय आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवून यंत्रणा अधिक सजग केली आहे.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, प्रकरण व्यवस्थापन, कुटुंबाचा सातत्याने पाठपुरावा, तसेच शिक्षण, कौशल्य विकास, समुपदेशन आणि पोषण सेवांशी समन्वय साधण्याचे काम या अभियानामार्फत राबविण्यात आले होते. यामध्ये कोकण विभाग (रायगड) - २ बालविवाह, पुणे विभाग (पालघर) - १, नाशिक विभाग - सांगली (१), नाशिक (२), अहिल्यानगर (५), छत्रपती संभाजीनगर विभाग - परभणी (१), लातूर (१), बीड (३), हिंगोली (१), धाराशिव (२), संभाजीनगर (४), बुलडाणा (१), अमरावती विभाग - अकोला (४), नागपूर विभाग - यवतमाळ (२), चंद्रपूर (२) असे एकूण ३२ बालविवाह रोखण्यात यश मिळाले.

बालविवाह हा केवळ कायद्याचा भंग नसून बालकांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन आहे. बालविवाह रोखण्याबरोबरच संबंधित बालिकांच्या पुनर्वसन, शिक्षण आणि संरक्षणासाठीही ठोस पावले विभागामार्फत उचलली जात आहेत. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या पालक व मध्यस्थांवर कारवाई सुरू असून, यापुढेही अशा घटना घडू नये यासाठी कठोर कारवाई सुरूच राहणार आहे.

या अभियानाच्या अनुषंगाने विभाग व युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत जिल्हाधिकारी, तज्ज्ञ प्रतिनिधी तसेच राज्यातील सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी आणि चाइल्ड हेल्पलाइन प्रतिनिधी सहभागी झाले होते.

## फटाक्यांच्या गोदामात भीषण स्फोट; ६ जणांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : केरळच्या त्रिशूर जिल्ह्यातील मुंडाथिकोड गावात फटाक्यांच्या गोदामात भीषण आग आणि स्फोटाची घटना घडली आहे. या दुर्घटनेत किमान ६ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत.

ही घटना वडक्कनचेरी नगरपालिकेअंतर्गत येणाऱ्या मुंडाथिकोड गावात घडली. येथे आगामी २६ एप्रिल रोजी होणाऱ्या प्रसिद्ध त्रिशूर पूरम उत्सवासाठी फटाके आणि कच्चा माल एका शेडमध्ये साठवून ठेवण्यात आला होता. केरळ राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून मिळालेल्या माहितीनुसार, घटनास्थळावरून १३ जणांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. जखमींपैकी ५ जणांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. तर २ जणांना रुग्णालयातील वॉर्डमध्ये दाखल करण्यात आले आहे. तसेच १७ जणांना किरकोळ दुखापती झाल्या आहेत.प्राथमिक अहवालानुसार, स्फोट इतका तीव्र होता की त्याचे धक्के अनेक किलोमीटरपर्यंत जाणवले आणि काहींनी तो भूकंप असल्याचा समज केला. या दुर्घटनेत ४० हून अधिक लोक भाजले गेले असून अनेकांची प्रकृती चिंताजनक आहे.

घटनेनंतर परिसरातील रुग्णालयांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून बचावकार्य वेगाने सुरू आहे. हे फटाक्यांचे गोदाम तिरुवंबाडी देवासम यांच्याशी संबंधित असल्याचे सांगितले जात आहे. तसेच, येथे सुरक्षा नियमांची तपासणी सुरू करण्यात आली आहे.प्रशासनाने या घटनेची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले असून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कठोर पावले उचलण्याचे संकेत दिले आहेत.

## पंतप्रधान मोदींना संबोधले दहशतवादी; कॉँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांची जीभ घसरली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चेन्नई : तमिळनाडूतील प्रचार संपण्यासाठी मंगळवारी अवघे काही तास उरले असतानाच काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी 'पंतप्रधान दहशतवादी आहेत', असा खळबळजनक आरोप केला. मात्र, चूक लक्षात येताच सारवासारव करत आपल्या म्हणण्याचा मथितार्थ पंतप्रधान राजकीय पक्ष तसेच लोकांमध्ये दहशत पसरवत आहेत, असा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तमिळनाडू विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने अण्णाद्रमुकशी युती केली आहे. त्यावरून चेन्नईतील पत्रकार परिषदेत खर्गे यांनी पंतप्रधानांवर टीकास्त्र सोडले. 'अण्णाद्रमुकचे लोक त्यांच्या प्रचारफलकांवर अण्णादुराई यांचे छायाचित्र लावतात. ते मोदींबरोबर कसे जाऊ शकतात? ते दहशतवादी आहेत', असे खर्गे म्हणाले. पत्रकारांनी 'दहशतवादी' या मुद्द्यावर खर्गे यांना विस्तारपूर्वक बोलण्याचा आग्रह केला. त्यावेळी बोलण्याच्या ओघात झालेली चूक त्यांच्या लक्षात आली. खर्गे यांनी तातडीने सारवासारव करत आपल्या म्हणण्याचा मथितार्थ पत्रकार परिषदेत विशद केला. 'मोदी दहशतवादी आहेत, असे मी म्हणालो नाही, अशी सारवासारव त्यांनी केली.



पंतप्रधानांना दहशतवादी म्हणणे ही बोलण्यातील चूक नसून तो काँग्रेसचा हेतुपुरस्सर कट आहे, अशी टीका भाजपचे प्रवक्ते संबित पात्रा यांनी केली. तर काँग्रेस हा शहरी माओवाद्यांचा पक्ष असून या पक्षाचा रिमोट कंट्रोल राष्ट्रद्रोही लोकांच्या हातात असल्याचे यातून सिद्ध होते, असा पलटवार भाजपचे प्रवक्ते प्रदीप भंडारी यांनी केला. खर्गे यांच्या विधानावर भाजपने तातडीने पलटवार केला. हा १४० कोटी लोकांचा अपमान असून त्यात आठ कोटी तमिळी बंधूभगिनींचाही समावेश आहे. राहुल गांधी आणि तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी जाहीर माफी मागावी, अशी मागणी केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी केली. पंतप्रधानांवर आरोप करून मतदार तुम्हाला मतदान करतील, या भ्रमात राहू नका. मतदारांनी तुम्हाला नाकारले आहे, अशी टीकाही गोयल यांनी केली. मोदी सत्ता आणि सरकारी यंत्रणांचा गैरवापर करून राजकीय पक्ष आणि लोकांमध्ये दहशत पसरवण्याचे काम करत आहेत. अण्णाद्रमुक त्यांच्याबरोबर युती कसे काय करू शकतात ?, असे वक्तव्य काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खग म्हणाले होते.

**अजितदादांच्या अपघाताबाबत सुनेत्रा पवारांनी अखेर मनातलं बोलून दाखवलं**

## अजितदादांच्या विमान अपघाताबाबत माझ्याही मनात शंका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बारामती : बारामती विधानसभेची पोटनिवडणूक २३ एप्रिल रोजी पार पडणार आहे. काल बारामतीत उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या प्रचाराची काल सांगता सभा झाली. या सभेसाठी राष्ट्रवादीच्या नेत्यांसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे देखील उपस्थित होत्या. यावेळी दिवंगत अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत सुनेत्रा पवार यांनी महत्वाचं विधान केलं.



अजित पवारांच्या विमान अपघाताला ३ महिने पूर्ण झाले आहे. काल त्यांच्या पत्नी आणि सध्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांनी पहिल्यांदाच अजित पवारांच्या विमान अपघाताबाबत शंका व्यक्त केली. अजितदादांच्या विमान अपघाताबाबत माझ्याही मनात शंका आहे. त्यामुळेच मी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन विनंती केली आहे. काही चुकीचं आढळल्यास कठोरात कठोर शिक्षा ही व्हायलाच हवी, असं सुनेत्रा पवार म्हणाल्या. अजितदादांच्या अपघाताबाबतच्या सर्व शंकांचं निरसन व्हायला हवं, अशी मागणीही सुनेत्रा पवारांनी बोलून दाखवली. यावेळी मुख्यमंत्री फडणवीसही मंचावर उपस्थित होते. सुनेत्रा पवारांनी केलेल्या मागणीवर फडणवीसांनीही उत्तर दिलं. अपघाताचं सत्य बाहेर आल्याशिवाय शांत बसणार नाही, असं देवेंद्र फडणवीसांनी सांगितलं.

**अजितदादा जरी गेले तरी त्यांची स्वप्न अजूनही जिवंत-सुनेत्रा पवार**

अजितदादा जरी गेले तरी त्यांची स्वप्न अजूनही जिवंत आहेत. अजितदादांची जागा कुणीच घेऊ शकत नाही. मात्र त्यांच्या विचाराचा वारसा मी पुढे घेऊन जाणार आहे. बारामतीकर जनता माझ्या पाठीशी आहे, तोपर्यंत मी खचणार नाही. मागे हटणार नाही. मी एका संघर्षयोद्ध्याची सहचारिणी आहे. येसुबाई जशा लढल्या, तसेच मी लढेन. अहिल्यादेवींनी जसा कारभार केला, तसाच कारभार करेन, असं सुनेत्रा पवार म्हणाल्या. ही माती माझी आहे, त्यामुळे दादांप्रमाणे तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवा, त्याला कधीच तडा जाऊ देणार नाही. आपण लाखोंचा पोशिंदा गमावला. दादांचं स्वप्न आणि त्यांच्या कर्तव्याची जाणीव, त्यांच्या पश्चात माझ्यावर आलेल्या जबाबदारीची जाणीव आहे. त्याचा शिवधनुष्य मी उचलून तुमच्यासमोर आले आहे. दादांच्या विचारांचा वारसा पुढे घेऊन जाईन, असंही सुनेत्रा पवारांनी सांगितलं.

**बारामतीकरांच्या अश्रूंचा बांध फुटला**

बारामतीतील सांगता सभेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी हजेरी लावली. बारामतीत दाखल होताच देवेंद्र फडणवीस सर्वात आधी अजित पवारांच्या स्मृतीस्थळावर गेले. देवेंद्र फडणवीसांनी स्मृतीस्थळावर जाऊन अभिवादन केलं. त्यानंतर देवेंद्र फडणवीस सभास्थळी दाखल झाले. देवेंद्र फडणवीसांनी त्यांच्या भाषणातून अजित पवारांच्या आठणीही जागवल्या. आधी अजित पवारांसंदर्भातील एक व्हिडीओ सभेत दाखवण्यात आला. या व्हिडीओत अजित पवारांची गाजलेली वक्तव्य, दादांच्या कामाची शैली, याचा उल्लेख करण्यात आला होता. हा व्हिडीओ पाहताना सभेला उपस्थित असलेले नेते आणि बारामतीकरांच्या अश्रूंचा बांध फुटला. त्यानंतर सभेत भाषण करताना अनेकांनी दादांच्या आठवणींना उजाळा दिला.

### बारामती विधानसभेसाठी २३ एप्रिलला मतदान

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी २०२६ रोजी निधन झाले. त्यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुक होत आहे. बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी येत्या २३ एप्रिल रोजी मतदान होईल. त्यानंतर ४ मे रोजी बारामतीच्या पोटनिवडणुकीचा निकाल जाहीर केला जाईल.

## संपादकीय....

### अर्थव्यवस्थेवर परिणाम

आखाती प्रदेशातील युद्ध हे केवळ दोन-तीन देशांपुरते मर्यादित राहात नाही, तर त्याचे पडसाद संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेवर उमटतात. तेलसंपन्न आखाती देश जागतिक ऊर्जा पुरवठ्याचे केंद्र असल्यामुळे तेथील अस्थिरता ही थेट आर्थिक अस्थिरतेत रूपांतरित होते. अशा युद्धपरिस्थितीत सर्वप्रथम फटका बसतो तो कच्च्या तेलाच्या किमतींना. तेलाच्या किमती झपाट्याने वाढू लागल्या की वाहतूक, उत्पादन, वीजनिर्मिती अशा सर्वच क्षेत्रांवर परिणाम होतो आणि महागाईचा भडका उडतो. भारतासारख्या तेलआयात-निर्भर देशासाठी ही परिस्थिती अधिकच गंभीर ठरते. आयातीवरील खर्च वाढल्याने चालू खाते तुटीवर ताण आता येतो, रुपयाचे अवमूल्यन होते आणि सरकारसमोर आर्थिक संतुलन राखण्याचे मोठे आव्हान उभे राहते. पेट्रोल-डिझेलच्या किमती वाढल्याने सर्वसामान्यांच्या खिशावर थेट परिणाम होतो, तर उद्योगक्षेत्रासाठी उत्पादनखर्च वाढतो. परिणामी, बाजारातील मागणी घटते आणि आर्थिक वाढीचा वेग मंदावतो. या पार्श्वभूमीवर कॉर्पोरेट कंपन्यांच्या नफ्यावर मोठा परिणाम दिसून येतो. उत्पादनखर्च वाढणे, कच्च्या मालाच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होणे आणि जागतिक मागणीत घट होणे या कारणांमुळे कंपन्यांच्या नफ्याचे प्रमाण कमी होते. अनेक कंपन्यांना खर्च कमी करण्यासाठी उपाययोजना कराव्या लागतात. त्यात नवीन प्रकल्पांना स्थगिती देणे, विस्तार योजनांना ब्रेक लावणे किंवा कर्मचाऱ्यांची कपात करणे यांचा समावेश असतो. अशा परिस्थितीत कॉर्पोरेट क्षेत्राची जोखीम घेण्याची क्षमता कमी होते आणि दीर्घकालीन गुंतवणुकीचे निर्णय पुढे ढकलले जातात. असे गंभीर परिणाम होत असल्याने परिस्थितीचा वेध घ्यायला हवा.




## खामसवाडी येथे गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते यांचा प्रशालेच्या वतीने सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे/खामसवाडी : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जिल्हा परिषद प्रशालेत तालुक्याचे गटशिक्षण अधिकारी श्री. धर्मराज काळमाते यांची नियमित गटशिक्षण अधिकारी म्हणून औसा जिल्हा लातूर या ठिकाणी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार समारंभ प्रशालेच्या वतीने भेटवस्तू देऊन करण्यात आला. सदरील सत्कार समाज कल्याण सभापती श्री. विश्वास कोकणे, श्रीमती सुवर्णाताई पाटील सदस्या पंचायत समिती कळंब,खामसवाडी गावाचे सरपंच श्री.अमोल पाटील,उपसरपंच श्री. दयानंद पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री. कुलदीप घावटे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. तसेच प्रशालेची 'डॉ बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा' म्हणून निवड झाल्याबद्दल प्रशालेचे माजी सेवानिवृत मुख्याध्यापक श्री.शिवाजी कोकाटे व श्री. दत्तात्रय रसाळ यांचे योगदान विचारात घेऊन विद्यमान प्रशालेचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक रामचंद्र पवार यांचेही या कामी योगदान मिळाल्याबद्दल या सर्वांचा सत्कार समाज कल्याण सभापती विश्वास कोकणे व गटशिक्षणाधिकारी काळमाते यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी उप शिक्षणाधिकारी मा.श्री संतोष माळी, मोहा केंद्राचे केंद्रप्रमुख श्री.अशोक डिकले, जाधववाडीचे मुख्याध्यापक वाघ, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राजकुमार शेळके (प्रा. शाळा खामसवाडी) व सर्व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य तसेच पत्रकार हनुमंत पाटुळे, शिवाजी बोबडे, गोपाल शेळके, दीपक सावंत, यांच्या सह प्रशालेतील शिक्षक श्रीमती मनूर, तुकाराम सुरवसे, अशोक पवार,प्रवीण लोमटे, शिवाजी वाघमारे, अनंत बाबर, नरसिंगे, श्रीमती गव्हाणे ,नरवटे, जमाले व लोंढे यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुखाध्यापक रामचंद्र पवार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती म्हेत्रे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री काळे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी ग्रामस्थ, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जागतिक वसुंधरा दिन पर्यावरणीय संकल्पाचा मुहूर्त




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मानवाच्या अस्तित्वाचा पाया म्हणजे वसुंधरा. आपल्या जीवनातील प्रत्येक श्वास, प्रत्येक थेंब पाणी आणि प्रत्येक अन्नकण हा या पृथ्वीच्या उदारतेचा परिणाम आहे. त्यामुळेच दरवर्षी २२ एप्रिल हा दिवस 'जागतिक वसुंधरा दिन' म्हणून साजरा केला जातो. आजच्या वेगवान औद्योगिकीकरणाच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात वसुंधरेचे संरक्षण ही केवळ जबाबदारी नसून अस्तित्वाची गरज बनली आहे.त्यामुळे जागतिक वसुंधरा दिवस साजरा करणे म्हणजे पर्यावरणीय संरक्षणासाठी आवश्यक संकल्प करणे होय.उद्याच्या पिढीसाठी पृथ्वी वाचवायची असेल,वसुधैव कुटुम्बकम ही संकल्पना राबवायची असेल आणि अस्तित्वातल्या सर्व जीव जंतूंचे रक्षण करायचे असेल, तर जागतिक वसुंधरा दिवसाला पर्यावरण रक्षणाची शपथ घेऊया !

**जागतिक वसुंधरा दिनाची सुरुवात आणि उद्देश**

जागतिक वसुंधरा दिनाची सुरुवात १९७० साली अमेरिकेत झाली. गेलॉर्ड नेल्सन या सिनेटरने पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती व्हावी यासाठी हा दिवस सुरू करण्याचा पुढाकार घेतला. त्या काळात औद्योगिक प्रदूषण आणि पर्यावरणीय हानी यामुळे समाजात अस्वस्थता निर्माण झाली होती. यामुळे पर्यावरण संवर्धनासाठी एक जागतिक चळवळ उभी राहावी, हा या दिवसामागील मुख्य उद्देश होता. पुढे संयुक्त राष्ट्रसंघानेही या उपक्रमाला मान्यता देत जागतिक पातळीवर याचे महत्त्व अधोरेखित केले.

**वसुंधरेचे वैशिष्ट्य आणि तिचे अद्वितीय स्थान**

संपूर्ण विश्वात पृथ्वी हा असा एकमेव ज्ञात ग्रह आहे जिथे जीवन अस्तित्वात आहे. पृथ्वीवर पाणी, हवा, तापमान आणि जैवविविधता यांचे अद्वितीय संतुलन आहे. सुमारे ४.५ अब्ज वर्षांचा इतिहास असलेली ही वसुंधरा अनेक भूगर्भीय आणि जैविक परिवर्तनातून आजच्या स्वरूपात आली आहे. या ग्रहाने असंख्य प्रजातींचा जन्म, उत्क्रांती आणि नाश अनुभवला आहे, तरीही जीवन टिकवून ठेवण्याची तिची क्षमता अद्वितीय आहे.

**वसुंधरेच्या रक्षणाची गरज**

आजच्या काळात वसुंधरेसमोर अनेक गंभीर आव्हाने उभी आहेत. हवामान बदल, ग्लोबल वॉर्मिंग, जैवविविधतेचा ऱ्हास, जलसंकट, जंगलतोड आणि प्रदूषण या समस्या दिवसेंदिवस तीव्र होत आहेत. विकास आणि पर्यावरणाचा ऱ्हास याबाबतीतही समतोल साधण्याची गरज निर्माण झाली आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या अहवालानुसार, जर ही स्थिती कायम राहिली, तर भविष्यात मानवी जीवनावर मोठे संकट येऊ शकते. त्यामुळेच वसुंधरेच्या रक्षणासाठी प्रत्येक व्यक्तीने सज्ज होणे अत्यावश्यक आहे.

**मानवाची भूमिका आणि उपाययोजना**

मानव समाजाने पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी ठोस पावले उचलणे गरजेचे आहे. पुनर्नवीनीकरण, ऊर्जा बचत, पाणी संवर्धन, वृक्षारोपण आणि शाश्वत विकास या उपाययोजना अत्यंत महत्त्वाच्या आहेत. भारताने हरित क्रांती, धवल क्रांती, आणि निळी क्रांती यांसारख्या उपक्रमांद्वारे अन्न, दूध आणि मत्स्य उत्पादनात मोठी प्रगती केली आहे. मात्र, या विकासासोबत पर्यावरण संतुलन राखणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

**भारतीय परंपरेतील वसुंधरेचा सन्मान**

भारतीय संस्कृतीत वसुंधरेला 'माता' मानले गेले आहे. संत परंपरेतही पर्यावरणाबाबत जागरूकता दिसून येते. संत ज्ञानेश्वरांनी पसायदानात अवघे विश्वचि माझे घर असे म्हणत सर्व सृष्टीला एक कुटुंब मानले आहे. तसेच संत तुकारामांनी वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरी असे सांगत निसर्गाशी असलेले आपले नाते अधोरेखित केले आहे. ही शिकवण आजही तितकीच महत्त्वाची आहे.

**आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञांचे योगदान**

पर्यावरण संरक्षणासाठी अनेक जागतिक शास्त्रज्ञांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. अमेरिकन सागरी जीवशास्त्रज्ञ, निसर्गलेखिका आणि आधुनिक पर्यावरण चळवळीच्या जनक श्रीमती रॅशेल कार्सन यांनी त्यांच्या 'सायलंट स्प्रिंग' या ग्रंथात पर्यावरणीय प्रदूषणाचे गंभीर परिणाम मांडले. निसर्गात कशाचेही अस्तित्व एकाकी नसते, ही बाब त्यांनी सप्रमाण सिध्द केली आहे.

हवामान शास्त्राचे जनक श्री जेम्स हॅनसेन यांनी, हवामान बदल हे मानवापुढील सर्वात मोठे संकट असल्याचे स्पष्ट करुन हवामान बदलाच्या धोक्यांविषयी जगाला सतर्क केले.

**भारताची भूमिका – वसुधैव कुटुंबकम**

२०२३ मध्ये भारतात पार पडलेल्या जी – २० शिखर परिषदेची मध्यवर्ती संकल्पना'वसुधैव कुटुंबकम' ही होती. याचा अर्थ संपूर्ण जग हे एक कुटुंब असून पर्यावरण संरक्षणासाठी सर्व देशांनी एकत्र येऊन कार्य करणे हीच काळाची गरज आहे. भारताच्या या भूमिकेमुळे जागतिक सहकार्याला नवे बळ मिळाले. पर्यावरणाचा ऱ्हास जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात झाला तरी त्याचा परिणाम जगाच्या अन्य भागावर होतो, ही बाब लक्षात घ्यायला हवी. पर्यावरण हा विषय भूभागांच्या सीमांचा , देशाच्या, धर्मांच्या, बंधनाचा नाही. तो अखिल मानव जातीच्या कल्याणाचा पाया आहे.

**जलसाठ्याचा पुनर्विकास आवश्यक**

जागतिक वसुंधरा दिन-पर्यावरणीय संकल्पाचा मुहूर्त-या विषयाची सुरुवात करताना एक साधी पण अत्यंत प्रभावी जाणीव लक्षात घ्यायला हवी, ती म्हणजे पर्यावरणाचा ऱ्हास थांबविणे. एक छोटेसे उदाहरण घेऊया, तुमच्या अवतीभवतीच्या एखाद्या तलावाचे निरीक्षण करा.कल्पना करा की तो कोरडा पडला.त्याच्या कोरडेपणामुळे कशा कशावर परिणाम होतो याचा विचार जरी केला तर पर्यावरणाचा ऱ्हासाचे किती वाईट परिणाम होतात, हे लक्षात येते.

उदाहरणार्थ कोरडा पडणारा एक तलाव वाचविणे हे केवळ जलस्रोत पुनर्जीवित करणे नसून संपूर्ण परिसंस्थेचा पुनर्जन्म घडविण्याचा शास्त्रीय प्रयत्न ठरतो. पाणी हे जीवनाचे मूलतत्त्व असल्याने जलसाठ्यांचे संगोपन केल्यास भूजल पातळी पुनर्भरण (ग्राऊंडवाटर रिचार्ज) होते, जलचक्र संतुलित राहते आणि परिसरातील सूक्ष्म हवामान (मायक्रोक्लायमेट) स्थिर होते. तलावाभोवती ओलावा वाढल्याने वनस्पती, पक्षी, कीटक व सूक्ष्मजीव यांची जैवविविधता नैसर्गिकरीत्या वाढते, ज्यामुळे अन्नसाखळी बळकट होते आणि परिसंस्थेचे संतुलन राखले जाते. अशा जलाशयांमुळे कार्बन शोषण (कार्बन सिक्वेस्ट्रेशन) सुलभ होऊन हवामान बदलाच्या परिणामांना आळा बसतो, तसेच मृदेची धूप कमी होऊन जमिनीची सुपिकता टिकून राहते. परिणामी, स्थानिक समुदायाला शाश्वत उपजीविका मिळून शाश्वत विकास साध्य होतो. पृथ्वीचे वैशिष्ट्य म्हणजे पंचमहाभूतांचे-पृथ्वी, जल, वायू, अग्नी आणि आकाश-समतोल सहअस्तित्व; त्यामुळे या घटकांचे संरक्षण म्हणजेच पर्यावरण संवर्धनाची मूळ संकल्पना होय. म्हणूनच एक तलाव वाचविणे म्हणजे केवळ पाणी साठवणे नव्हे, तर संपूर्ण वसुंधरेचे संतुलन जपण्याचा आणि भविष्यातील जीवन सुरक्षित ठेवण्याचा जागतिक स्तरावरील पर्यावरणीय संकल्पच होय.

**माझी वसुंधरा ६.० अभियान**

महाराष्ट्र शासनाने पर्यावरण संरक्षणासाठी माझी वसुंधरा ६.० या अभियानाच्या माध्यमातून व्यापक आणि समन्वित उपाययोजना राबविल्या आहेत. या अभियानात राज्यातील सर्व महापालिका, नगरपरिषद आणि ग्रामपंचायतींचा सक्रिय सहभाग निश्चित करण्यात आला असून, स्थानिक स्वराज्य संस्थांना पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी देण्यात आली आहे. पंचमहाभूतांच्या संकल्पनेवर आधारित या योजनेत पृथ्वी, जल, वायू, अग्नी आणि आकाश या घटकांचे संतुलन राखण्यावर भर दिला जातो. शासनाने वृक्षारोपण, जलसंधारण, सांडपाणी पुनर्वापर, कचरा व्यवस्थापन आणि हरित ऊर्जा वापर यांसारख्या उपक्रमांना प्रोत्साहन दिले आहे. कार्बन उत्सर्जन कमी करून हवामान बदलाचा प्रभाव कमी करण्यासाठी विविध हरित उपक्रम राबविण्यात येत आहेत. नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी ई-प्रतिज्ञा, जनजागृती मोहिमा आणि पर्यावरण दूत यांची संकल्पना राबविण्यात आली आहे. स्थानिक संस्थांनी केलेल्या कामांचे जिओ-टॅगिंग, ऑनलाइन नोंदणी आणि तृतीय पक्ष मूल्यांकन यामुळे पारदर्शकता सुनिश्चित केली जाते. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संस्थांना पुरस्कार देऊन स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्यात आले आहे. शाळा व महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवून पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण केली जात आहे. शासनाच्या विविध विभागांमध्ये समन्वय साधून शाश्वत विकास साधण्याचा प्रयत्न केला जात आहे.

प्लास्टिकमुक्ती, स्वच्छता अभियान आणि हरित परिसर निर्मिती यावर विशेष भर देण्यात आला आहे. पर्यावरण संरक्षणाला लोकचळवळीचे स्वरूप देत नागरिकांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. या सर्व उपाययोजनांद्वारे महाराष्ट्र शासन पर्यावरण संतुलन राखण्यास आणि भावी पिढ्यांसाठी सुरक्षित व निरोगी वसुंधरा निर्माण करण्यास कटिबद्ध आहे.

जागतिक वसुंधरा दिन हा केवळ एक दिवस नसून, तो आपल्याला निसर्गाशी असलेले नाते पुन्हा दृढ करण्याची संधी आहे. वसुंधरेचे रक्षण करणे म्हणजे आपल्या भविष्याचे रक्षण करणे होय. म्हणूनच जागतिक वसुंधरा दिनाला - वसुधैव कुटुंबकम भूमिकेत येऊ हा संदेश प्रत्येकाच्या मनात रुजला पाहिजे.

आपण प्रत्येकाने छोट्या-छोट्या कृतीतून पर्यावरणाचे संरक्षण केले, तरच ही सुंदर वसुंधरा पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित राहील.त्यामुळे आजचा दिवस पर्यावरणाच्या ऱ्हासाला पायबंद घालताना पर्यावरण निर्मितीच्या संकल्पना राबविण्यासाठी शपथ घेण्याचा आहे.

## अतिउष्णतेच्या संकटाचा सामना करण्यासाठी सक्षम उपाययोजना करणार

(पान १ वरून...) नागपूरसह विदर्भात उन्हाळ्याची तीव्रता अधिक असते. या समस्येला तोंड देण्यासाठी महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू करण्यात आला आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (आयआयएम) नागपूर आणि अमेरिकेतील नॅचरल रिसोर्सेस डिफेन्स कौन्सिल' (एनआरडीसी) या आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्थेमध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारानुसार आयआयएम' नागपूरमध्ये उष्णता प्रतिसादक्षम व शाश्वत शीतकरणासाठी सेंटर फॉर एक्सलेन्स' या विषयावर उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्यात आले आहे. महाराष्ट्रासह मध्य भारतातील उष्णतेचा वाढता प्रभाव लक्षात घेऊन, या केंद्रामार्फत त्यावर उपाय शोधण्याचे काम केले जाणार आहे. राज्यात राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थाकेंद्र शासनाच्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या धर्तीवर मिहान, नागपूर येथे स्थापन करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. यासाठी शासनाने रु. १८४ कोटी मंजूर केले आहेत. या इमारतीचे बांधकाम महाप्रित यांच्या माध्यमातून करण्यात येणार असून त्यामध्ये आठ सेंटर फॉर एक्सलन्स असणार आहेत. त्यातील एक केंद्र हे सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर हिट रेझिलन्स ण्ड सस्टेनेबल कुलिंग हे असणार आहे. यासाठी नॅचरल रिसोर्सेस डिफेन्स कौन्सिल न्यूयॉर्क या स्वयंसेवी संस्थेचे तांत्रिक सहकार्य लाभणार आहे.सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर हिट रेझिलन्स ण्ड सस्टेनेबल कुलींग कामकाज राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्था (एसआयडीएम) मिहान, नागपूर येथून चालविण्यात येणार आहे.

नागपूरसारख्या शहरांमध्ये दरवर्षी तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या पुढे जाते. वाढत्या उष्णतेचा परिणाम लोकांच्या आरोग्यावर, कामकाजावर, पाण्याच्या उपलब्धतेवर आणि वीज वापरावर होतो. त्यामुळे उष्णतेचा सामना करण्यासाठी योग्य नियोजन आणि उपाययोजना करणे अत्यावश्यक झाले आहे. हे केंद्र उष्णतेचा नागरिकांवर आणि शहरांवर होणारा परिणाम समजून घेऊन, त्यावर सोपे आणि प्रभावी उपाय सुचवेल. विशेष म्हणजे, थंडावा मिळवताना पर्यावरणावर ताण येऊ नये, यावरही भर दिला जाईल. सुरुवातीला हे केंद्र आयआयएम नागपूरच्या परिसरात कार्यरत राहील. येथे संशोधन, प्रशिक्षण आणि धोरणात्मक मार्गदर्शन यावर भर दिला जाईल.

**मेळाव्यास पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

**मेळाव्याच्या निमित्ताने पालक आणि शिक्षक यांच्यात झालेल्या संवादाचा फायदा मात्र विद्यार्थ्यांना होणार हे निश्चित!**

# स्वेरीत कॉम्प्युटर सायन्स व एमसीए या विभागांचा पालक मेळावा उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग (सीएसई) व पदव्युत्तर पदवी असलेल्या मास्टर ऑफ कॉम्प्यूटर ॲप्लीकेशन्स (एमसीए) या दोन्ही विभागांतर्फे एकत्रितरीत्या 'पालक मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यास पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या मेळाव्याच्या निमित्ताने पालक आणि शिक्षक यांच्यात झालेल्या संवादाचा फायदा मात्र विद्यार्थ्यांना होणार हे निश्चित!



यावेळी व्यासपीठावर पालक प्रतिनिधी म्हणून महेश मोटे व महिला पालक प्रतिनिधी म्हणून सौ. अक्काताई साळुंखे हे उपस्थित होते. स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार यांच्या सहकार्याने व उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार, कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ.प्राजक्ता सातारकर व एमसीए विभागाचे प्रमुख प्रा. एम.वाय. शेख यांच्या नेतृत्वाखाली या पालक मेळाव्याचे आयोजन केले होते. दीपप्रज्वलनानंतर कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागातर्फे प्रा.व्ही. डी.जाधव तर एमसीए विभागातर्फे विभागप्रमुख प्रा. एम.वाय शेख यांनी आपल्या विभागातील विशेष लक्षवेधी सुविधांबाबत माहिती दिली. यामध्ये प्रयोगशाळेत उपलब्ध यंत्र सामुग्री, मशीन्स पासून ते इंडस्ट्रीयल व्हिजीटच्या माध्यमातून प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी कामकाज कसे चालते याचे प्रात्यक्षिक, स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांची आकडेवारी, अत्यंत अवघड असणाऱ्या 'गेट' या परीक्षेत विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश आदी संबंधित बाबींवर प्रकाश टाकला. गेट परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण आणि उच्च करिअरची दारे खुली होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून विद्यार्थ्यांसंदर्भात विकासात्मक धोरण, नियोजनात्मक मार्गदर्शन आणि उच्चशिक्षित प्राध्यापकांच्या सहकार्याने स्वेरीत 'गेट' परीक्षेची करून घेतली जाणारी तयारी याबाबत सांगितले. प्रत्येक वर्षी विविध विषयांचे मार्गदर्शन वर्ग आयोजित करून तसेच 'डव्हान्सड टेक्निकल ट्रेनिंग'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अशा परीक्षांसाठी आवश्यक संपूर्ण तयारी करून घेतली जाते. वेळोवेळी घेतल्या जाणाऱ्या टेस्ट आणि त्यांचे विश्लेषण यामधून विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणातील अद्ययावत माहिती दिली जाते. त्यामुळे स्वेरीतील विद्यार्थ्यांना अशा परीक्षांमध्ये घवघवीत यश मिळत असल्याचे सांगितले तसेच या परीक्षेसाठी अत्यावश्यक असणारे सर्व स्टडी मटेरियल हे स्वेरीच्या नूतन इमारतीत असलेल्या मुख्य लायब्ररीमधून उपलब्ध करून दिले जाते, असे सांगण्यात आले. प्लेसमेंट विभागाचे प्रा.ए.ए.मोटे यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्वाच्या असणाऱ्या 'गेट परीक्षा, स्वेरीमध्ये येणाऱ्या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कंपन्या,प्लेसमेंट विभागामार्फत चालणारे कार्य, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढीसाठी व करिअर करण्यासाठी आवश्यक बाबी, इंग्रजी भाषा कौशल्ये, संभाषण कौशल्य, सादरीकरण, प्रकल्प, तांत्रिक प्रशिक्षण इंटर्नशीप, स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी? हे करताना पालकांनी कोणती भूमिका घ्यावी ? आदी करिअरच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची माहिती पालकांना दिली. यावर्षी २०२५-२६ मध्ये झालेल्या 'गेट' परीक्षेत कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागातून एकूण अठरा विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. यावेळी यशस्वी व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सुरेश साळुंखे, बाबुराव गांडूळे यांच्यासह काही पालकांनी काही सूचना केल्या. यावर उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार यांनी काही सूचनांचे तात्काळ निरसन केले तर काही प्रश्न वरिष्ठ पातळीवर व चर्चेतून सोडविण्याचे आश्वासन दिले.

यावेळी दोन्ही विभागांतील प्राध्यापक वर्ग, जवळपास १०० पालक, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. सुप्रिया शेगदार यांनी सूत्रसंचालन केले तर विभागप्रमुख डॉ.प्राजक्ता सातारकर यांनी आभार मानले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पंढरपूर विकास आराखड्याच्या कामास गती देण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

## वारकरी भाविकांना अडचणी येऊ नयेत याची दक्षता घ्यावी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आषाढी वारी काळात निघणाऱ्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग व श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना चांगल्या सुविधा मिळण्यासाठी दोन्ही पालखी मार्गावरील पालखीतळे अधिक चांगली व सुविधायुक्त करण्यात यावीत, वारकरी भाविकांना अडचणी येऊ नयेत याची दक्षता घ्यावी तसेच पंढरपुरात येणाऱ्या भाविकांना व स्थानिक नागरिकांना पायाभूत सुविधा मिळाव्यात यासाठी पंढरपूर विकास आराखड्याच्या कामास गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

पालखी मार्गांवरील विश्रामस्थळ सुविधा निर्मिती संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहात बैठक झाली. यावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल आदी यावेळी उपस्थित होते.

पुणे विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांनी सादरीकरणाद्वारे श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग व श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गातील विविध विकास कामांची माहिती दिली.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग व श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गातील विविध विकास कामांसाठी सुमारे १३०३ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला होता. त्यापैकी ९६४ कोटी रुपये मंजूर झाले असून त्यातील ९५९ कोटी रुपये खर्च झाले आहेत. या आराखड्यांतर्गत दोन्ही पालखी मार्गातील पालखीतळांच्या ठिकाणी स्वच्छतागृहांसाठी सेफ्टी टँक, कमानीचे बांधकाम करणे, जमीन सपाटीकरण करणे, हायमास्ट पोल उभारणे, संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे, रस्त्यांची दुरुस्ती, पालखी कट्टा तयार करणे आदी कामांपैकी बहुतांश कामे पूर्ण झाली असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, यंदा २५ जुलै रोजी आषाढी एकादशी आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे प्रस्थान ८ जुलै रोजी तर श्री संत तुकाराम महाराज पालखीचे प्रस्थान ७ जुलै रोजी होणार आहे. दोन्ही पालखी मार्गावर वारकरी भाविकांना कोणत्याही अडचणी येऊ नयेत याची दक्षता घ्यावी. पालखी सोहळ्याच्या विश्वस्तांशी चर्चा करून त्यांना आणखी कोणत्या सुविधा हव्यात त्या करून द्याव्यात. पालखी तळावर कायमस्वरुपी पायाभूत सुविधांची कामे करावीत. पालखी तळावर वारकऱ्यांसाठी गेल्या वर्षी हँगरची व्यवस्था करण्यात आली होती, त्या प्रमाणे यंदाही अतिरिक्त हँगरची व्यवस्था करावी. पालखी मार्गावरील महामार्गांची अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करावीत.

पुलकुंडवार म्हणाले की, पालखी मार्गावरील विकास कामे पूर्ण करण्यात येत असून यावर्षी वारकऱ्यांना कोणत्याही अडचणी येणार नाहीत, याची दक्षता घेतली आहे. गेल्या वर्षी दोन्ही पालखी मार्गावर ३७०० मोबाईल शौचालये पुरविण्यात आली होती. यंदा ५ हजार मोबाईल शौचालये पुरविण्याचे नियोजन आहे.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या वतीने दोन्ही पालखी मार्गावरील महामार्गांची कामे जवळपास पूर्ण होत आली आहेत. दिवेघाट ते हडपसर आणि बारामती ते इंदापूर मार्गांची कामे सुरू आहेत, अशी माहिती यावेळी देण्यात आली.



नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंदराज, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव ई रवींद्रन, सोलापूरचे जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस., मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी, उपमुख्यमंत्री महोदय यांचे सचिव राजेश देशमुख, राष्ट्रीय महामार्ग विभागाचे प्रकल्प संचालक संजय कदम आदी उपस्थित होते.

---

# भोंदूबाबा अशोक खरात व त्यांचे पत्नीने फसवणूक केल्याप्रकरणी सोलापूर पोलीस अधीक्षक यांचेकडे तक्रार दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : कळमण तालुका उत्तर सोलापूर येथील शेतकरी राजाराम रामचंद्र बनसोडे यांनी छावा संघटनेचे ॲड. योगेश नागनाथ पवार यांच्यामार्फत आज पोलीस अधीक्षक, सोलापूर यांच्याकडे भोंदूबाबा अशोक खरात व त्यांचे पत्नी व अन्य व्यक्तींविरुद्ध फौजदारी तक्रार दाखल केली आहे. सोलापूर पोलिसांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन सर्व आरोपींवर तात्काळ कठोर कारवाई करावी, अन्यथा छावा संघटनेच्यावतीने मोठे आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा छावाचे ॲड. योगेश पवार यांनी दिला आहे.

याबाबत सविस्तर हकीकत अशी की, तक्रारदार राजाराम बनसोडे हे गट क्र. २००/१ मधील ११ एकर ०८ गुंठे शेतजमिनीचे मूळ मालक आहेत. भोंदूबाबा अशोक खरात यांची ब्लॅक मनी व्हाइट करणारे नरखेड (तालुका मोहोळ) येथील शुक्राचार्य मारुती कोल्हाळ व रणजित ब्रम्हचारी कोल्हाळ यांनी दीड कोटी रुपयांचे आश्वासन देऊन नोव्हेंबर २०२१ मध्ये सदर जमीन भोंदूबाबा अशोक खरात यांचेसाठी अवघ्या ५० लाख रुपयांत खरेदी केली. व उर्वरित १ कोटी रुपये सदरील जमीन शोक खरात यांचे नांवावर झाल्यावर देतो, असे संगितले. परंतु, जमीन नावे झाल्यावरही अशोक खरात व कोल्हाळ यांनी पैसे देण्यास टाळाटाळ केली.

मार्च २०२४ मध्ये रणजित कोल्हाळ याने हीच जमीन अशोककुमार एकनाथ खरात व कल्पना खरात यांना तब्बल २ कोटी ४० लाख ९१ हजार २०० रुपयांत विकली. खरेदीखतात शेतात ४-५ वर्षांची २,००० डाळिंबाची झाडे, बोरवेल, विहीर, शेड व गोठा असल्याचा खोटा उल्लेख केला. प्रत्यक्षात जमिनीत कोणतीही फळबाग नाही व जमीन तक्रारदार मुळ मालकांच्याच ताब्यात आहे. त्या जमिनीचे शासकीय बाजारमूल्य ७९ लाख असतानाही तिप्पट किमतीने व्यवहार करून काळा पैसा पांढरा करण्याचा हा सुनियोजित कट असल्याचे तक्रारीत नमूद आहे. तसेच शक्तीपीठ महामार्गाच्या संपादनापोटी मिळणारे ८-१० कोटी रुपये हडपण्यासाठी २००० डाळिंब दाखवून नियोजनबध्द कट रचण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

तसेच राजाराम बनसोडे यांनी पैशांची मागणी केली असता खरात व कोल्हाळ या आरोपींनी जीवे मारण्याची धमकी दिली व जादूटोणा करून संसार उद्ध्वस्त करण्याची भीती घातली. भोंदूबाबाची दहशत व राजकीय वरदहस्त यामुळे बनसोडे यांना तक्रार दिली नसल्याचे सांगितले. शेतकर्यांची फसवणूक केल्याप्रकरणी अशोक खरात, कल्पना खरात, शुक्राचार्य कोल्हाळ, रणजीत कोल्हाळ, रविकिरण नगाणे व गणेश मलपे यांचेविरुध्द भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ४६७, ४६८, ४७१, ५०६, १२०(ब), ३४ तसेच महाराष्ट्र जादूटोणा प्रतिबंधक अधिनियम कलम ३(१) अन्वये गुन्हा दाखल करणेसाठी पोलीसांत तक्रार दाखल करण्यात आलेली आहे.

**– ॲड. योगेश नागनाथ पवार**
**९८५००३९८२७**

---

# पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड योजना, पशु पालकांना शून्य टक्के व्याजदरात कर्ज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राज्यातील पशुपालन शेळी मेंढी पालन, कुकूटपालनास आणि वराह पालन करणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्यासाठी पशुसंवर्धन विभागातर्फे पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड (के सी सी) मोहीम राबवण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत ज्या शेतकऱ्यांकडे किसान क्रेडिट कार्ड नाही, त्यांना एक लाख ६० हजार रुपयापर्यंत चेक कर्ज वितरण उपलब्ध करून दिले जाईल. दूध संस्थेने आम्ही दिल्यास ही मर्यादा तीन लाखापर्यंत वाढवता येते. ज्याच्याकडे आधीच



किसान कार्ड आहे . त्यांना तीन कर्जाचा मूळ व्याजदर ९% असला तरी नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून तीन टक्के आणि राज्य शासनाच्या ११ फेब्रुवारी २०२० च्या नियमानुसार चार टक्के अशी एकूण ६० टक्क्यापर्यंत व्यास सवलत मिळू शकते व बँकांनाही या दोन टक्के व्याज सवलत देण्यात आली आहे त्यामुळे नियमित कर्जफेड करणाऱ्या पशुपालन शेतकऱ्यांना या योजनेअंतर्गत शून्य टक्के व्याजदरातही लाभ घेता येणार येऊ शकतोलाखापर्यंत ची प्रथम मर्यादा वाढवून घेता येईल पशुपालन व पशुपालनच्या देखभालीसाठी हे दैनंदिन खेळती भांडवल व्याजदरात सवलतीसह कर्ज, दूध संघ किंवा दूध उत्पादक कंपनीचे सभासद आहेत व त्यांनी अद्याप या योजनेचा लाभ घेतलेला नाही अशा सर्व शेतकरी मोहिमेसाठी पात्र आहेत जिल्ह्याचे पशुसंवर्धन उपयुक्त या योजनेचे सह नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहत आहेत सह स्थितीत पशुपालन करणाऱ्या ज्या पशुपालकांनी या योजनेचा लाभ घेतलेला आहे अशा पात्र पशुपालकांना या योजनेअंतर्गत लाभ घेता येईल २५००० मासल कुकुट पक्षी ५० हजार व त्यापेक्षा कमी उत्पादक अंडी उत्पादक कुकुट पक्षी पंचाळीस हजार पेक्षा कमी क्षमतेच्या हिंचरी युनिट शंभर किंवा त्यापेक्षा कमी मेंढी, शेळी, गोठा, ५०० किंवा त्यापेक्षा कमी मेंढी शेळी त्यापेक्षा कमी वराह पालन कर्जाची परतफेड कर्ज उचल केलेल्या तारखेपासून एक वर्षाच्या आत कर्ज परतफेड करणे आवश्यक राहील.

---

# तामलवाडी येथे पंचायत समितीचा जनता दरबार संपन्न



**जनतेच्या प्रश्नासंदर्भात तालुकाप्रमुख जगन्नाथ गवळी आक्रमक.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तुळजापूर / प्रतिनिधी : तामलवाडी, ता. तुळजापूर येथे पंचायत समिती, तुळजापूर आयोजित जनता दरबार संपन्न झाला. या जनता दरबार मध्ये नागरिकांच्या विविध जवळपास ४६ अडचणी मा. सभापती विक्रम देशमुख यांच्यासह सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांसमोर मांडण्यात आल्या.

घरकुल थकीत बिल हप्ते, शेतरस्ते, विद्युत समस्या, पाणी समस्या यांसारख्या अनेक समस्या मा. सभापती महोदयांनपुढे मांडण्यात आल्या. बहुतांश समस्यांचे निरसन तात्काळ करत उर्वरित सर्व समस्या लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन यावेळी मा. सभापती महोदय यांच्या वतीने सर्व नागरिकांना देण्यात आले.

यावेळी पंचायत समितीचे सभापती श्री. विक्रम मालक देशमुख, ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख जगन्नाथ गवळी तामलवाडी चे मा. सरपंच दत्तात्रय मामा वडणे, कृ. उ. बाजार समितीचे मा. संचालक यशवंत अण्णा लोंढे, तामलवाडी चे उपसरपंच सुधीर दादा पाटील, सांगवी काटी चे सरपंच अमोल पाटील, विठ्ठल नरवडे सर, कृष्णा घोटकर, अमोल घोटकर, पांडुरंग लोंढे यांच्यासह विविध विभागाचे प्रशासकीय अधिकारी, मतदारसंघातील अनेक आजी माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व शेतकरी बांधव उपस्थित होते.

---

**ॲपमुळे लाभार्थ्यांना योजनांची संपूर्ण प्रक्रिया थेट मोबाईलवरून करता येणार**

# अण्णासाहेब पाटील महामंडळाचे डिजिटल पाऊल मोबाईल ॲपमुळे लाभार्थ्यांना थेट सेवा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाने डिजिटल दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकत Annasaheb Patil Mahamandal App हे मोबाईल ॲप सुरू केले आहे. या ॲपमुळे लाभार्थ्यांना योजनांची संपूर्ण प्रक्रिया थेट मोबाईलवरून करता येणार असून सेवा अधिक सुलभ, जलद आणि पारदर्शक होणार आहे.




महामंडळाच्या विविध योजनांसाठर www.udyog.mahaswayam.gov.in (udyog.mahaswayam.gov.in in Bing) हे संकेतस्थळ कार्यान्वित आहे. मात्र अर्ज प्रक्रियेसाठी संगणक किंवा सायबर कॅफेचा आधार घ्यावा लागत असल्याने लाभार्थ्यांना वेळ व खर्च करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर, ३ सप्टेंबर २०२५ रोजी नागरी सुविधा केंद्र व आपले सरकार केंद्रांशी करार करून प्रति सेवा ८५ रुपये दराने सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. आता पुढील टप्प्यात मोबाईल ॲपची सुविधा सुरू करण्यात आली आहे.

हे ॲप Google Play Store वर उपलब्ध असून, नवीन वापरकर्ते मोबाईल क्रमांक, नाव व ई-मेलद्वारे OTP पडताळणी करून नोंदणी करू शकतात. पूर्वी नोंदणीकृत लाभार्थ्यांना त्यांच्या लॉगिन आयडी व पासवर्डद्वारे थेट लॉगिन करून पुढील प्रक्रिया करता येणार आहे.

महामंडळाच्या योजनांमध्ये LOI, Sanction आणि Claim असे तीन टप्पे असून आवश्यक कागदपत्रे ॲपद्वारे अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध आहे. अर्जाची स्थिती तपासणे, अद्ययावत माहिती मिळवणे आणि पुढील कार्यवाही करणेही शक्य झाले आहे. विशेष म्हणजे, क्लेम सादर करणाऱ्या व नव्याने मंजूर झालेल्या लाभार्थ्यांसाठी व्यवसायाचे जिओ-टॅग केलेले छायाचित्र अपलोड करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

जिओ-टॅगिंग व जिओ-फेन्सिंग प्रणालीचा वापर करून गूगल नकाशाच्या सहाय्याने व्यवसाय पाहणीचे नियोजन करण्यात येणार आहे. ही माहिती महामंडळाच्या EHRMS प्रणालीशी जोडण्यात येणार असून पुढील टप्प्यात ही सुविधा ॲपमध्येही उपलब्ध होणार आहे.

मोबाईल ॲपमध्ये संगणक प्रणालीवरील सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे लाभार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर ॲप डाउनलोड करून या डिजिटल उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास महामंडळाचे जिल्हा समन्वयक, सौरभ मगर यांनी पत्रकान्वये केले आहे.

---



# मंगरूळ येथे मातंग समाज बांधवांच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे /खामसवाडी : कळंब तालुक्यातील मंगरूळ येथील सकल मातंग समाजातील कार्यकर्त्यांच्या वतीने महामानव, बोधिसत्व,भारतरत्न, भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चारित्र्यावर भाषणे घेण्यात आली. यावेळी गावातील सोहम विलास सौदागर या विद्यार्थ्यांची जवाहर नवोदय विद्यालय तुळजापूर येथे निवड झाल्याबद्दल या विद्यार्थ्यांचा शाल, श्रीफळ,फेटा बांधून सत्कार करण्यात आला. या जयंती कार्यक्रमासाठी गावातील ज्येष्ठ नागरिक भागचंद भागरेचा, जिल्हा परिषद सदस्य जयवंत कुंभार, तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक बांधव उपस्थित होते. या वेळी सकल मातंग समाजातील कार्यकर्ते महादेव कांबळे, समाधान कांबळे, रोहित तोरड, मेजर मधुकर कांबळे, अनिल सहाने, सुनील कांबळे, गणेश कांबळे, महेश कांबळे, यांच्या सह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या जयंतीचे आयोजन उत्सव कमिटीचे अध्यक्ष आकाश राजहंस यांनी केले. सूत्रसंचालन बाळासाहेब कांबळे यांनी तर उपस्थितांचे आभार महादेव कांबळे यांनी मानले.

**कळंब तालुक्यातील मंगरूळ येथील मातंग समाज बांधवांच्या वतीने (२०२६) या वर्षी पासुन महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्याचा संकल्प केला असुन. या पुढे ही दरवर्षी ही परंपरा कायम चालू राहील असे समाज बांधवांच्या वतीने सांगण्यात आले. मातंग समाज बांधवांच्या वतीने महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी केल्याबद्दल उत्सव कमिटीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.**

# ‘मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता’साठी आता रुग्णालयामार्फत अर्ज ऑनलाइन प्रणालीमुळे ८ तासात मंजुरी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण; अर्ज मंजुरीची प्रक्रिया आठ तासात पूर्ण होणार, रुग्णांना मिळणार दिलासा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून मदत मिळविण्यासाठी रुग्णांना हेलपाटे पडू नये व तातडीने उपचार मिळावे यासाठी म्हणून मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षात नवीन ऑनलाइन प्रणाली सुरू होणार असून, त्यामुळे ८ तासातच मदतीला मंजुरी मिळू शकणार आहे. यात रुग्णाऐवजी रुगणालायामार्फत या योजनेसाठी अर्ज सादर करता येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते २० एप्रिल रोजी या प्रणालीचे लोकार्पण करण्यात आले.

राज्यातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना उपचारासाठी आर्थिक साह्य मिळावे या उद्देशाने नागपुरात मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या योजेनेतून मदत मिळविण्यासाठी आता पर्यंत रुग्णाचे नातेवाईकच कागदपत्रांची जुळवाजुळव करून अर्ज करीत होते.

मात्र मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने आता ऑनलाइन प्रणाली सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे अर्ज मंजुरीची प्रक्रिया आठ तासात पूर्ण होणार आहे. विशेष म्हणजे रुग्णाऐवजी थेट कक्षाशी संलग्न असणाऱ्या रुग्णालयामार्फत अर्ज सादर होणार आहे. त्यामुळे रुग्णाला कोणत्याही प्रकारचा अर्ज भरावा लागणार नाही. तसेच उपचार प्रक्रियेला गती मिळू शकेल.

गेल्या काही वर्षांपासून या कक्षामध्ये रुग्णांना सोईचे होतील



असे बदल करणे सुरू आहेत. नवीन ऑनलाइन प्रणाली त्याचाच एक भाग आहे. रुग्णाने रुग्णालयात सर्व रीतसर कागदपत्रे दिल्यानंतर रुग्णालय प्रशासन त्याचा अर्ज मुख्यमंत्री सहायता निधी कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविणार आहे. त्या ठिकाणी नियमानुसार सर्व कागदपत्रे असल्यास अर्ज मंजुरीची प्रक्रिया कार्यालयीन आठ तासात पूर्ण केली जाईल. त्यामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना मोठा दिलासा मिळू शकणार आहे.

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या आर्थिक वर्षात राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. त्यामुळे सीएसआर अंतगर्त विशेष निधी उपलब्ध होऊन गरजू रुग्णांना दर्जेदार उपचार मिळणार आहेत.

नागपूर जिल्ह्यामध्ये मागील वर्षी नमो नेत्र संजीवनी शिबिर, आरोग्याचा श्री गणेशा व इतर आरोग्य शिबिर अशी एकूण ७४७ शिबिरे आयोजित करण्यात आली. त्याचा लाभ ५३,४२२ रुग्णांनी घेतला.

रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत यासाठी यासाठी ही ऑनलाइन प्रणाली विकसित करण्यात येत आली आहे. त्यामुळे आता अर्ज मंजुरीची प्रक्रिया जलद होऊन रुग्णांना मोठा दिलासा मिळेल. तसेच वेळेवर कागदपत्र उपलब्ध नसलेल्या रुग्णांकरिता मुख्यमंत्री सचिवालय (हैद्राबाद हाऊस सिव्हिल लाइन्स नागपूर) येथे ऑफलाईन स्वरूपात पूर्वीप्रमाणे व्यवस्था सुरू राहणार आहे. सदर नवीन प्रणाली राज्यभरात प्रभाविपणे राबविली जाणार असल्याचे नागपूर येथील मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख व सदस्य सचिव डॉ. सागर पांडे यांनी म्हटले आहे.

# आयटी कंपन्यांमधील कामगार हिताच्या उपाययोजनांकरिता अभ्यास गट : कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील आयटी क्षेत्रातील कामगारांच्या हिताचे रक्षण करणे, त्याकरिता उपाय योजना सुचविणे याबाबत विस्तृत व दूरगामी कार्यवाही अपेक्षित असल्याने. त्यासाठी अभ्यास गट गठीत करणार असल्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी दिले. मंत्रालयात पुणे शहरातील हिंजवडी येथील आय टी पार्क मधील विविध आय टी कंपन्यांमध्ये असलेल्या कामगारांच्या समस्यांबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले. बैठकीस आमदार शंकर जगताप, अपर मुख्य सचिव श्रीमती आय. ए कुंदन, कामगार आयुक्त एच पी तुम्मोड, उपसचिव स्वप्नील कापडणीस आदींसह आय टी कामगार संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर म्हणाले, आयटी कंपन्यांमध्ये कर्मचाऱ्यांवर होणारी जबरदस्ती, राजीनामा घेण्याची अन्यायकारक प्रक्रिया आणि एचआर नियमांमधील त्रुटी दूर करण्यासाठी उपाय योजना आवश्यक आहेत. या संदर्भात सखोल अभ्यासासाठी विशेष अभ्यास गट गठीत करण्यात यावा. आयटी कंपन्यांमध्ये कर्मचाऱ्यांना जबरदस्तीने राजीनामा देण्याची सक्ती केली जात असल्याच्या तक्रारी वारंवार येत आहेत. या पार्श्वभूमीवर अशा प्रकारच्या घटनांची सखोल चौकशी करावी. एचआर नियम आणि कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करण्याच्या पद्धतींचे नियमन झाले पाहिजे. कर्मचाऱ्यांचे पीएफ खाते असलेले आणि जुन्या कंपनीने डी लिंक न केलेल्या कर्मचाऱ्यांच्याबाबत भविष्य निर्वाह निधी कार्यालयाला कळविण्यात यावे. याबाबत पत्रव्यवहार करून अशा कर्मचाऱ्यांना मदत करावी.

शॉप क्ट परवाना असलेल्या प्लेसमेंट एजन्सींची माहिती घ्यावी. अनेकदा प्लेसमेंट एजन्सींच्या माध्यमातून होणाऱ्या नियुक्तीत अनियमितता आढळते. त्यामुळे अशा सर्व एजन्सींच्या कागदपत्रांची पडताळणी करून त्यांची सत्यता तपासण्यात यावी. आयटी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यासाठी विशेष जनजागृती मोहीम राबवावी. कामगार विभागाच्या सीआयएस (उखड) प्रणालीचा वापर करून कर्मचाऱ्यांना त्यांच्या तक्रारी कशा नोंदवता येतील, याची माहिती कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचवण्याची कार्यवाही करावी, असे निर्देशही कामगार मंत्री ॲड फुंडकर यांनी दिले.

# नवी मुंबई महापालिकेतील आर्थिक अनियमिततेवर उपाध्यक्ष बनसोडे यांचे कठोर कारवाईचे निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : नवी मुंबई महानगरपालिकेतील आर्थिक अनियमिततेप्रकरणी संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिले. विधान भवन येथे आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी संबंधित अधिकारी उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानातील विविध कामांमध्ये अनावश्यक खर्च झाल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून सात दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.


या कामांशी संबंधित ठेकेदारांची नावे अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश देण्यात आले असून, दोषी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करून ब्लॅकलिस्टमध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचेही बनसोडे यांनी यावेळी सांगितले.



# मोरा गावातील मच्छीमारांच्या नुकसानभरपाईचा प्रश्न मार्गी लावा : मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : जे. एन. पी. ए. मार्फत चौथ्या बंदराच्या भरावाच्या कामामुळे मोरा मच्छीमार सोसायटी तसेच मोरा (ता. उरण जि. रायगड) गावातील मच्छीमार यांच्या झालेल्या नुकसान भरपाई संदर्भात मत्स्यव्यवसाय विभागाने नियमानुसार आवश्यक कार्यवाही करून हा प्रश्न मार्गी लावावा, असे निर्देश मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी दिले.



मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीला आमदार महेश बालदी, मत्स्यव्यवसाय सचिव डॉ. एन. रामास्वामी, आयुक्त प्रेरणा देशभ्रतार आदी उपस्थित होते.

मोरा मच्छीमार सोसायटी तसेच मोरा गावातील मच्छीमार यांना नुकसान भरपाई देण्यासाठी याचे वर्गीकरण करून त्याबाबतचा अहवाल संबंधित विभागाकडे पाठविण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

गस्ती नौका, ड्रोन खरेदीचा आढावा

मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी मत्स्यव्यवसाय विभागामार्फत खरेदी करण्यात येणाऱ्या पाच गस्ती नौका व ड्रोन खरेदी बाबतचा आढावा घेतला. गस्ती नौका व ड्रोन खरेदी प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी अशा सूचनाही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना यावेळी दिल्या.

## योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा : ना. प्रतापराव जाधव


# केंद्र शासनाच्या योजनांचा केंद्रीय आयुष व कुटूंब कल्याण राज्यमंत्री यांनी घेतला आढावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा (जिमाका) : केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ तळागाळातील शेवटच्या घटकापर्यंत प्रभावीपणे पोहोचवावा, असे निर्देश केंद्रीय आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री तथा दिशा’ समितीचे अध्यक्ष प्रतापराव जाधव यांनी दिले.

बुलढाणा जिल्ह्यातील केंद्रीय योजनांच्या प्रगती आढावा घेण्यासाठी मंगळवारी जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण अर्थात दिशा’ समितीची बैठक जिल्हा नियोजन समिती सभागृहात पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय राज्यमंत्री तथा खासदार ना. प्रतापराव जाधव हे होते. या बैठकीला जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, यांच्यासह उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीच्या प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जल व्यवस्थापन





कृती पंधरवडा मोहिमेअंतर्गत जलकुंभ पूजन केंद्रीय राज्यमंत्री श्री. जाधव यांच्या हस्ते झाले. त्यानंतर पाण्याच्या काटकसरी वापराबाबत उपस्थितांना जलप्रतिज्ञा देण्यात आली.

केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पाचा आढावा घेतला. यावेळी सिंचन प्रकल्पबाधीतांच्या पुनर्वसन आणि भूसंपादन प्रक्रियेची माहिती घेतली. यात भूसंपादन प्रक्रियेबद्दल लोकांच्या तक्रारींचे निराकरण करावे. बुडीत क्षेत्रातील बाधीतांचे ज्या ठिकाणी पुनर्वसन केले जात आहे त्या ठिकाणी रस्ते, पाणी, वीज आदी पायाभूत सुविधा उपलब्ध करुन द्यावे. यासह जिगांव सिंचन प्रकल्पातील उपलब्ध पाण्याचे नियोजन करावे. पुनर्वसन गावांना प्रत्यक्ष भेटी देवून पाहणी करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी ना. प्रतापराव जाधव यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा आढावा घेतला. २०२४-२५ वर्षात खरीप आणि रब्बी हंगामांतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील सुमारे ५ लाख ८८ हजार ४२८ शेतकऱ्यांना %१२ कोटी रुपये रक्कमेचा पीक विमा नुकसान भरपाई वितरित करण्यात आले आहे. या शिवाय सन २०२५-२६ खरीप व रब्बी हंगामातील पीक विम्याची प्रक्रिया सुरु असून लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा होणार आहेत. तसेच ३ लाख ५३ हजार ५१२ लाभार्थ्यांचे ई-केवायसी पूर्ण झाली असून २ हजार ४९५ प्रलंबित आहे, अशी माहिती कृषी विभागाने दिली. त्याबाबत ई-केवायसी तसेच मयत झालेल्या व वारसा हक्क अभावी या योजनेचा लाभ न मिळालेल्या शेतकऱ्यांना संपर्क करुन त्यांना योजनेचा लाभ द्यावा. यासाठी तलाठी, ग्रामसेवक व कृषी सेवाकांनी गावनिहाय भेटी देवून कृषी योजनांची माहिती व त्याचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवा. तसेच शेतीमध्ये पिकविले जाणारे पिकांची पारदर्शकपणे नोंद घेऊन पिक विमा, नुकसान भरपाईचा लाभ मिळवून द्यावा. अडचणी असलेल्या शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करा त्यांचे प्रश्न सोडवा, असे निर्देश केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी दिले.

मुख्यमंत्री सौर वाहिनी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना दिवसा विज मिळावी यासाठी आवश्यक ते उपाययोजना करावे. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत शालेय विद्यार्थ्यांना पोषण आहार दिला जातो. या आहाराची नियमितपणे तपासणी करुन चांगल्या प्रतीचा आहार विद्यार्थ्यांना मिळेल याची खात्री करावी. सीएससी सेंटर, आधार सेवा केंद्रांवर नागरिकांची लुट सुरु असल्याच्या तक्रारी असून अशा केंद्रांची तपासणी करा, आढावा घेवून कारवाई करा, अशा सूचना केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

या बैठकीत ना. प्रतापराव जाधव यांनी प्रधानमंत्री सुर्यघर योजना, मनरेगा, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, १५ वा केंद्रीय वित्त आयोग, गृहनिर्माण योजना, जलजीवन मिशन, अटल भूजल योजना, मजीप्रा, पाणी टंचाई निवारनार्थ उपयोजना, स्वच्छ भारत मिशन, राष्ट्रीय आरोग्य योजना, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना, कौशल्य विकास योजना, पीएम श्री शाळा, डिजिटल इंडिया, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे प्रकल्प, नगरपरिषदेच्या योजना, नवीन शैक्षणिक प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेतला.